दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ रविवार, १५ मार्च २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३३४ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# उद्योगांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी उभारी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



## भद्रावती येथे न्यू एरा क्लिनटेक आणि ग्रेटा एनर्जीच्या हरित पोलाद प्रकल्पाचे भूमिपूजन

**चंद्रपूर :** विदर्भात विपुल प्रमाणात खनिज संपत्ती आहे. या संपत्तीचा प्रदुषणमुक्त कसा वापर करावा, याचे नियोजन करूनच भद्रावती परिसरात दोन हरित पोलाद प्रकल्प उभारण्यात येत आहे. उद्योगांमुळे एक ईको सिस्टीम तयार होते. रोजगार निर्मितीसोबत सेवाक्षेत्रात वाढ होते. तसेच त्याचा फायदा परिसरातील पर्यटनक्षेत्रालाही होतो. एकप्रकारे देशाच्या अर्थव्यवस्थेला उद्योगांमुळे मोठी उभारी मिळते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भद्रावती एमआयडीसी परिसरात न्यू एरा क्लिनटेक प्रा. लि. आणि ग्रेटा एनर्जी प्रा. लि. च्या एकात्मिक हरीत पोलाद प्रकल्पाचे भूमिपूजन करताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशन रेड्डी, आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार सर्वश्री किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, माजी मंत्री हंसराज अहीर, माजी खासदार अजय संचेती, कोल इंडियाचे चेअरमन संजीव कुमार झा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, ग्रेटा एनर्जीचे चेअरमन नितेश चौधरी, वैभव काकुलते, व्यवस्थापकीय संचालक हेमंत पांडे (वेकोली), अनुप गोयल (ग्रेटा एनर्जी), बाळासाहेब दराडे (न्यू एरा क्लिनटेक), मधुसूदन अग्रवाल, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन आदी उपस्थित होते.

भारताच्या इतिहासात एका आगळ्यावेगळ्या उद्योगाचे आज भद्रावती (जि. चंद्रपूर) येथे भूमिपूजन होत आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वातावरण बदल हा जगासमोर मोठा प्रश्न आहे. त्याचा फटका शेतीसोबतच उद्योगांनाही बसतो. त्यामुळे खनिज संपत्तीचा प्रदूषणमुक्त उपयोग करण्यावर भर देण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी जगातील उत्तम तंत्रज्ञानसह खनिजांचे उत्पादन करण्यास



पुढाकार घेतला आहे. याच माध्यमातून कोल गॅसिफिकेशनचे सात प्रकल्प येत आहेत, त्यापैकी चार प्रकल्प महाराष्ट्रात आणि तेही विदर्भात येणार आहे. असे धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या दोन्ही उद्योगांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठी भर पडणार आहे.

विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया येथे स्टील हब तयार होत आहे. या परिसरात तीन लक्ष कोटी रुपयांची गुंतवणूक आली असून एक लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. गडचिरोलीची आदिवासी मुले तर ऑस्ट्रेलियात शिक्षण घेत आहेत. या क्षेत्रातील भविष्य हे ग्रीन स्टीलचे आहे. उद्योगातून जेवढे ग्रीन स्टील तयार होईल, त्याला 100 टक्के निर्यात मार्केट आहे. न्यू एरा आणि ग्रीन एनर्जी या दोन्ही उद्योगांच्या माध्यमातून या परिसरात 10 हजार रोजगार उपलब्ध होईल. तंत्रज्ञ व इतर जॉबसाठी चंद्रपूर व आसपासच्या गावातील तरुणांना प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून द्यावा. राष्ट्रकार्य पूर्ण करायचे असेल तर 70 ते 80 टक्के स्थानिकांना रोजगार देणे आवश्यक आहे. उद्योगांच्या पाठीशी सरकार नेहमीच उभे आहे. उद्योगाच्या ईको सिस्टीमचा फायदा येथील स्थानिकांना झाला पाहिजे. या दोन प्रकल्पामुळे चंद्रपूरचे नाव देशाच्या नकाशावर झळकले आहे.

पूर्व विदर्भात मायनिंगवर आधारित उद्योग येत असल्यामुळे येथील अर्थव्यवस्था पूर्णपणे बदलत आहे. आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेने अनेक देशातील अर्थव्यवस्थांना मागे टाकले आहे. जगात 30 व्या क्रमांकाची आपल्या राज्याची अर्थव्यवस्था आहे. शेती, उद्योग, सेवाक्षेत्र सर्वच क्षेत्रात गुंतवणूक करून रोजगार निर्मितीच्या माध्यमातून राज्याला पुढे नेण्याचा आपला संकल्प आहे, असे यावेळी मुख्यमंत्री म्हणाले.

**औद्योगिक विकासात कोळशाची भुमिका अतिशय महत्त्वाची – केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी**

देशात कोळशाची कमी नाही. विकासासाठी तसेच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कोळशाचा उपयोग होतो. देशाच्या औद्योगिक विकासात कोळशाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे, असे केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले, चंद्रपूर आणि भद्रावती या भागात नवीन तंत्रज्ञानायुक्त औद्योगिक कंपनी येत आहे. यातून या भागाचा विकास होईल. दोन्ही कंपन्यांच्या आगमनाने येथील स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून 17 हजार कोटीची गुंतवणूक भद्रावती येथे येत आहे.

कोल गॅसिफिकेशनसाठी आपण विदेशावर अवलंबून होतो. मात्र देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून तंत्रज्ञानयुक्त कोल गॅसिफिकेशनची संकल्पना आली आहे. हा परिसर कोल गॅसिफिकेशनचे हब होईल. सात पैकी चार प्रकल्प या भागात येत आहे. महाराष्ट्र हे औद्योगिक प्रगत राज्य आहे. एक ट्रिलियन अर्थव्यवस्था होण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे. ज्यांनी या प्रकल्पासाठी जमीन दिली, त्यांनी देश निर्माण करण्यासाठी एक पाऊल उचलले आहे. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पात स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार द्यावा तसेच वेळेपूर्वी हा प्रकल्प पूर्ण करावा, असे ते म्हणाले.

**ग्रेटा एनर्जी प्रा. लि.चा कोळसा गॅसिफिकेशन आधारित स्टील प्रकल्प**

ग्रेटा एनर्जी समुहातर्फे भद्रावती एम.आय.डी.सी. परिसरात ग्रीनफिल्ड स्टील प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी पहिला व दुसरा टप्पा मिळून एकूण भांडवली गुंतवणूक सुमारे 10319 कोटी इतकी आहे. या प्रकल्पामुळे सुमारे 5 हजार लोकांना थेट व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे.

**न्यू एरा क्लिनटेक प्रा. लि.चा भारतातील पहिला एकात्मिक कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्प**

न्यू एरा क्लीनटेक कंपनीद्वारे भारतातील पहिला ग्रीनफिल्ड कोळसा गॅसिफिकेशन (कोळसा ते रसायने) प्रकल्प भद्रावती येथे 1650 एकरच्या औद्योगिक भूखंडावर उभारण्यात येत आहे. या प्रकल्पात दरवर्षी 50 लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक कोळशावर प्रक्रिया करून उच्च मूल्याची रसायने निर्माण केली जातील.ग्रेटा एनर्जीच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक अनुप गोयल यांनी तर न्यू एरा प्रा. लि. च्या वतीने व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब दराडे यांनी प्रास्ताविकातून आपापल्या प्रकल्पाबद्दल माहिती दिली.

---

## युवा संकल्प महाराष्ट्र आदर्श समाजरत्न भूषण पुरस्कारासाठी प्रस्ताव स्वीकारणे सुरु

### संकल्प बहुद्देशीय संस्था व ग्रामीण युवा बहुद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजन

**प्रतिनिधी/अकोला** :' संकल्प बहुद्देशीय संस्था अकोला व ग्रामीण युवा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र आदर्श समाजरत्न भूषण पुरस्कारासाठी प्रस्ताव स्वीकारणे सुरु असून सामाजिक, साहित्यिक, कृषि, वन्यजीव, कला, लेखक, शिक्षण, डॉक्टर,वकील, सांस्कृतिक,पत्रकारिता इत्यादी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकांना सन्मान कर्तुत्वाचा या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून पुणेयेथे हा पुरस्कार सोहळा मार्च महिन्यात

होईल. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी, प्रमाणपत्र व शाल या स्वरूपात असून या पुरस्कार सोहळ्याची तयारी सुरु आहे. आयोजक प्रबोधनकार सागर वाघमारे, ज्योती गायकवाड, अश्विन लोंढे, इजी. सतीश देवराव हातोले, गौतम भंडारे, सतीश भारत हातोले, राष्ट्रपाल भोजने, दादासाहेब तेलगोटे, सुरेखा इंगळे, गौतम इंगळे, राहुल खरात,सोनाली सुतार, प्रतीक्षा वासनिक या पुरस्कार सोहळ्याचे मुख्य आयोजक नरेंद्र इंगळे असून आपला प्रस्ताव किंवा माहिती या संपर्क किंवा 8888437330 /9960315554 व्हाट्सअप नंबर वर पाठवावी अशी माहिती पत्रकार नरेंद्र इंगळे यांनी दिली यांनी दिली.



## शाळेच्या १०० मीटर हद्दीतच गुटख्याची सर्रास विक्री; दिव्यातील ‘वारेकर शाळे’जवळील प्रकाराने विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात!

**दिवा (विशेष प्रतिनिधी):** राज्यात गुटखा आणि सुगंधी तंबाखूवर बंदी असतानाही दिव्यात मात्र प्रशासनाचा कोणताही धाक उरलेला नाही. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास सक्त मनाई असताना, चक्क ‘वारेकर शाळे’च्या १०० मीटर हद्दीतच एका पानटपरीवर गुटख्याची खुलेआम विक्री सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे शाळकरी मुलांचे आरोग्य आणि भवितव्य व्यसनाच्या खाईत ढकलले जात आहे.

‘कोटपा’ (COTPA) कायद्यानुसार शाळा, महाविद्यालय किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर




परिसरात सिगारेट, गुटखा किंवा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणे हा दंडनीय अपराध आहे. दिवा येथील मुंब्रा देवी कॉलनी रोड, प्रशांत नगर (दुकान क्र. ००९, विघ्नहर्ता गुरुकुल) येथे असलेल्या एका पानटपरीवर बंदी असलेल्या गुटख्याच्या माळा उघडपणे लटकवून विकल्या जात आहेत. ही टपरी वारेकर शाळेच्या अगदी १०० मीटरच्या परिसरात असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

लहान मुलांवर वाईट परिणाम:

शाळेत जाणाऱ्या-येणाऱ्या लहान मुलांच्या आणि विद्यार्थ्यांच्या रोज हे दृश्य नजरेस पडते. शाळेच्या इतक्या जवळच हा विषारी पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याने, तरुण पिढी आणि शाळकरी मुले या व्यसनाच्या आहारी जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

प्रशासनाने डोळ्यांवर पट्टी बांधली आहे का?

राज्यात गुटखा बंदी असूनही या टपरीचालकाकडे एवढा साठा येतो कुठून? स्थानिक पोलीस, ठाणे महानगरपालिका आणि अन्न व औषध प्रशासन (FDA) या गंभीर प्रकाराकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहेत का? असा संतप्त सवाल आता विद्यार्थ्यांचे पालक आणि स्थानिक नागरिक विचारत आहेत.

कठोर कारवाईची मागणी:

शाळेच्या १०० मीटर हद्दीत गुटखा विकणाऱ्या या टपरीवर प्रशासनाने तातडीने कारवाई करून ती बंद करावी, तसेच त्यांना हा माल पुरवणाऱ्या मुख्य साखळीचा शोध घेऊन गुन्हे दाखल करावेत, अशी तीव्र मागणी जोर धरू लागली आहे. विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या या प्रकारावर संबंधित विभाग आता तरी जागी होणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

---

## कानपूर मध्ये झालेल्या अथर्व यात्रा कंपनी बस अपघात, अपघातग्रस्त व्यक्तींना मदत पोहचविण्यासाठी व चौकशीसाठी युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत पोलीस मित्र मदतीसाठी सज्ज

**निफाड प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** निफाड तालुक्यातील काही प्रवासी आयोध्या येथे प्रभू रामाच्या दर्शनासाठी गेले होते परंतु गेलेल्या प्रवाशांचा दुर्दैवी अपघात झाला

या अपघातात अपघाती झालेल्या अपघातग्रस्त नातेवाईकांना त्यांची भेट करून देण्यासाठी खूप अडचण येत होती यावेळी तत्काळ राहुल उन्हवणे यांनी अपघात ग्रस्त व्यक्तींची माहिती भ्रमणध्वनी वरून युवा क्रांती पोलीस मित्र सहकाऱ्यांना दिली माननीय जयश्रीताई आहिरे युवा क्रांती




पोलीस मित्र राष्ट्रीय युवती अध्यक्ष व अमर शिवाजी पठारे पश्चिम महाराष्ट्र युवा अध्यक्ष युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत पोलीस मित्र यांनी निफाड तालुक्यातील अथर्व यात्रा कंपनी लक्झरी स्लीपर कोच बस चा झालेल्या अपघाताबाबत त्यांच्याकडे असलेल्या संपर्काच्या आधारावर कानपूर एसपी ऑफिस मधून माहिती घेऊन सदर नातेवाईकांना त्यांच्या माध्यमातून मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तसेच माहिती घेऊन देवेंद्र सिंग पीएसआय स्वरूप पोलीस ठाणे यांचा संपर्क नंबर घेऊन त्याचप्रमाणे हॉस्पिटलचे लोकेशन मिळवून महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्हा निफाड तालुक्यातील ग्रामीण भागातून आयोध्या येथे दर्शनाला जाणाऱ्या भाविकांना जयश्री ताई आहिरे व अमर शिवाजी पठारे पश्चिम महाराष्ट्र युवा अध्यक्ष युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत पोलीस मित्र यांच्याकडून खूप मोठी मदत झाली. त्यांनी फोनवर संपर्क साधत उत्तर प्रदेश कानपूर येथे पोलीस यंत्रणेची संपर्क करून सदर घटनेत घडलेली माहिती उपलब्ध करून दिली व नातेवाईकांना पोहोचण्यासाठी दिलासा मिळाला तेथील हॉस्पिटल तेथील सामाजिक यंत्रणा यांच्याशी संपर्क करून रुग्णांना मदत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला त्याबद्दल मी राहुल उन्हवणे युवा क्रांती पोलीस मित्र चांदोरी शहराध्यक्ष. संपूर्ण निफाड तालुका भाविकांच्या वतीने आपले मनःपूर्वक आभार व्यक्त करतो व आपला मनःपूर्वक आदर व्यक्त करतो आपल्या सहकार्यामुळेच व आपल्या जनसंपर्कामुळे आपल्याकडे असलेल्या गुण कौशल्यामुळे आपल्या आज आपल्या नाशिक जिल्हा निफाड तालुक्यातील अपघात ग्रस्त प्रवाशांना एक आधार मिळाला पोहोचण्याचा एक संपर्क मार्ग मिळाला तो केवळ तुमच्यामुळे त्यामुळेच तुमचे आभार व्यक्त करतो.

## वीज तारेच्या घर्षणामुळे गव्हाचे पीक जळून खाक; शेतकऱ्याचे मोठे नुकसान

**प्रदीप पोटफोडे/कोळी बोडखा :-** दि. 14 रोजी दुपारी कोळी बोडखा शिवारामध्ये वीज तारेच्या घर्षणामुळे लागलेल्या आगीत एका शेतकऱ्याचे गव्हाचे पीक जळून खाक झाले. या घटनेत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

केकत जळगाव येथील शेतकरी कारभारी भीमराव बडे यांची कोळी बोडखा शिवारात शेती आहे. या शेतामध्ये सुमारे दीड एकर क्षेत्रावर गव्हाचे पीक घेतले होते. पीक पूर्णपणे काढणीस आले असताना महावितरणच्या वीज तारेच्या



घर्षणामुळे अचानक आग लागली. या आगीत संपूर्ण गव्हाचे पीक जळून खाक झाले.

घटनेमुळे शेतकऱ्याचे सुमारे एक लाख रुपयांपर्यंत नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. कष्टाने उभे केलेले पीक डोळ्यांसमोर जळून गेल्याने शेतकरी हतबल झाला आहे. दरम्यान, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनेचा पंचनामा करून शेतकऱ्याला तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## संपादकीय

### ‘अल्पसंख्याक’ आबादानी!

...या शाळा वा शिक्षण संस्थांना ‘५० टक्के विद्यार्थिसंख्ये’ची अट नाही; धर्मच नव्हे तर भाषिक स्तरावरही अल्पसंख्य दर्जा बहाल केल्यामुळे ‘शिक्षण हक्का’कडे दुर्लक्षाची मुभा राजरोस!

‘अल्पसंख्याकांचे लांगूलचालन करणारे सरकार’ हा आरोप २०१४ नंतर देशात आणि २०१५ नंतर राज्यात फार कमी होत असतो. राज्यातल्या सरकारची प्रतिमा बहुसंख्याकांचे हित जोपासणारे अशी झालेली आहे. मात्र याच सरकारने अल्पसंख्याक असा दर्जा शाळा तसेच संस्थांना देण्याच्या बाबतीत हात खूपच सैल सोडलेला दिसतो. का या प्रश्नामागची कारणे अनेक! त्यावर सविस्तर मत नोंदवले जाईलच. सर्वात आधी ही चर्चा सुरू कशी झाली त्याविषयी. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे सारे राज्य शोकसागरात बुडाले असताना अल्पसंख्याक दर्जाचे प्रकरण गाजले. त्या खात्याचे मंत्री असलेले दादा हयात नसताना असा दर्जा कुणी बहाल केला असा प्रश्न उपस्थित झाला व सरकारने लगेच या निर्णयाला स्थगिती दिली. असा दर्जा देण्याचे आदेश काढणाऱ्या सहसचिवाची तातडीने बदली करण्यात आली. नंतर असे लक्षात आले की दादांनीच ही फाइल मंजूर केली होती व ऑनलाइन सेवा बंद असल्याने केवळ आदेश निघाले नव्हते. ते दादा गेल्यावर दुसऱ्या दिवशी निघाले. हा सर्वांना ठाऊक असलेला घटनाक्रम. मात्र यानिमित्ताने हे दर्जा प्रकरण नेमके काय याबाबत मिळणारी माहिती धक्कादायक आहे.

केंद्र सरकारने १९९२ मध्ये लागू केलेल्या कायद्यानुसार मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी व जैन या धर्मांतील लोकांनी काढलेल्या शिक्षण संस्थांना ‘अल्पसंख्याक’ असा दर्जा मिळतो. राज्याच्या पातळीवर या सहा धर्मांसह ‘भाषिक अल्पसंख्याक’ अशी श्रेणी जोडली गेली. यात हिंदी, कन्नड, मल्याळम, गुजराती, सिंधी, उर्दू, मारवाडी व गुजर भाषा बोलणारे संस्थाचालक समाविष्ट झाले. अल्पसंख्य या शब्दाची व्याख्या करायला गेले तर हेही योग्यच. केंद्राच्याच कायद्यानुसार अशा संस्थांना भरपूर अनुदान मिळते. त्या संस्थांच्या शाळा अनुदानित या व्याख्येत बसणाऱ्या असल्या तर. शिवाय या संस्थांमधील प्राध्यापक व शिक्षक भरतीत सरकारला हस्तक्षेप करता येत नाही. म्हणजे ‘पवित्र पोर्टल’पासून सुटका. या संस्थांना गरीब मुलांच्या मोफत शिक्षणासाठी सरकारने केलेला ‘आरटीई (राइट टु एज्युकेशन) अॅक्ट’ हा कायदा लागू होत नाही. म्हणजे गरीब मुलांना शिकवण्यापासून मुक्ती. या संस्थांना असा दर्जा मिळवण्यासाठी अटी दोनच. त्यावर ५० टक्क्यांपेक्षा जास्त संचालक अल्पसंख्याक या कक्षेत येणारे असावेत व या शाळांमध्ये शिक्षण घेणारे ५० टक्के विद्यार्थी अल्पसंख्य प्रवर्गातून येणारे असावेत. यात कोणत्याही राजकारण्याने वा मंत्र्यांनी हस्तक्षेप करू नये म्हणून केंद्र सरकारने दर्जा मंजूर करण्याचे अधिकार अधिकाऱ्यांच्याच हाती ठेवले. केंद्र व राज्यात सह किंवा उपसचिव दर्जाचा अधिकारी त्यासाठी प्राधिकृत करण्यात आला. किमान महाराष्ट्राचा विचार केला तर सुरुवातीला ही व्यवस्था उत्तमरीत्या कार्यरत होती. नंतर राज्यभरातील चाणाक्ष शिक्षणसम्राटांच्या लक्षात असे आले की संस्थेच्या कार्यकारिणीत ५० टक्के अल्पसंख्याक संचालकांचा भरणा केला तर सहज हा दर्जा मिळवता येऊ शकतो. चालबाजी सुरू झाली ती इथून. कार्यकारिणीवर अल्पसंख्य घेतले तर ५० टक्के अल्पसंख्य विद्यार्थी कुठून आणायचे हा मुद्दा यातला प्रमुख अडसर होता.

मग शिक्षणसम्राट कामाला लागले. त्यांनी अल्पसंख्याक मंत्रालयात संधान साधून एक नवा आदेश काढला. त्यात केंद्राने नमूद केलेली ही विद्यार्थ्यांची अटच वगळण्यात आली. त्यामुळे विद्यार्थी कुठून आणायचे हा प्रश्न आपसूकच मिटला. यानंतर असा दर्जा मिळवण्याचे प्रस्ताव शेकड्याने सरकारकडे सादर होऊ लागले. लगोलग ते मंजूरही होऊ लागले. महाराष्ट्रात २००९ या वर्षापासून आजतागायत सहा हजारांच्या आसपास संस्था अल्पसंख्य झाल्या. हा आकडा बघून अनेकांचे डोळे विस्फारतील.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर खेर्डा बु ॥ येथे संपन्न

## विभागीय आयुक्त डॉ श्वेता सिंघल; अप्पर जिल्हाधीकारी ब्रीजेश पटेल; उपविभागीय अधिकारी कैलास देवरे; तहसीलदार रवि महाले यांची उपस्थीती .






महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड:** तालूक्यातील खेर्डा बु येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर ज्ञानप्रकाश विद्यालयाचे प्रांगणात दि १४ मार्च रोजी घेण्यात आले . कार्यक्रम विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आला . प्रमुख अतिथी ब्रिजेश पाटील अप्पर जिल्हाधिकारी वाशिम , कैलास देवरे उपविभागीय अधिकारी कारंजा,कवडे अपर आयुक्त विकास अमरावती,तुकाराम टेकाळे उपायुक्त अमरावती राजू फडके उपआयुक्त अमरावती ; तहसीलदार रवी महाले कारंजा,नायब तहसीलदार विनोद हरणे ;अनिल वाडेकर, लक्ष्मण बनसोडे नायब तहसीलदार; श्रीमती पुनम राणे गटविकास अधिकारी कारंजा, विनोद जाधव भूमी अधीक्षक आरोग्य विभाग; ग्रामीण ठाणेदार प्रवीण शिंदे, तालुका कृषी अधिकारी अश्विनी भोसले;पशुवैद्यकीय अधिकारी वनवे पुरवठा विभाग नायगावकर अंगणवाडी सेविका दुय्यम निबंधक देशपांडे इत्यादींची प्रमुख उपस्थीती होती . प्रांगणात यावेळी सहकारी प्रयत्नांना जनभागाची साथ अनुलोम संस्थेकडून;सहाय्यक संचालक इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग वाशिम यांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले तथा लोकसेवा हक्क सेतू केंद्र आधार केंद्र उभारण्यात आले होते. यावेळी संजय गांधी श्रावण बाळ योजनेच्या 19 प्रकरणांना मंजुरात देण्यात आली. पुरवठा विभाग कडून 20 राशन कार्ड नावात दुरुस्ती नाव वगळणे व नाव वाढवणे इ कार्ड देण्यात आले. एकात्मिक बाल विकास प्रकल्प अंतर्गत तीन बेबीककिटचे वितरण करण्यात आले.भूमी अभिलेख कार्यालयाकडून 50 सनद वाटप करण्यात आली. अभियानांतर्गत फेरफार 36 निकाली काढण्यात आले. अभियानांतर्गत सातबारा दुरुस्ती 14 करण्यात आली. अभियान अंतर्गत डिजिटल सातबारा 149 वितरित करण्यात आले. आठ अ 149 वितरित करण्यात आले अभियाना अंतर्गत 247 प्रमाणपत्र वितरित करण्यात आले एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत 32 अर्ज निकाली काढण्यात आले.कमी जास्त पत्र 2 तयार करण्यात आले.कार्यक्रमाला 675 लाभार्थी उपस्थित होते.एकूण तक्रारी 5 प्राप्त झाल्या.आरोग्य तपासणी 195 लाभार्थ्यांना लाभ घेतला.

कार्यक्रम स्थळी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खेर्डा येथील विद्यार्थ्यांनी लेझिम नृत्याने मान्यवरांचे स्वागत केले.तसेच या विद्यार्थ्यांनी स्वागत नृत्य सादर करून कार्यक्रमाला रंगत आणली.

यावेळी पी.एम.श्री विद्यालयाचे शिक्षक गोपाल वसंतराव खाडे यांनी पारंपरिक ‘कच्ची घोडी’ लोकनृत्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाची माहिती उपस्थित नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवली. या लोकनृत्यातून पीएम किसान योजना, आधार कार्ड संबंधित सेवा, निवडणूक सर मॅपिंग ,आरोग्य विभागाच्या योजना, सातबारा दुरुस्ती, अग्रोस्टॅग,ई-मॅपिंग तसेच निवडणूक संदर्भातील .सर-मॅपिंग आदी बाबींबाबत जनजागृती करण्यात आली व होऊ घातलेल्या जनगणना२०२७ च्या अनुषंगाने जनजागृती करण्यात आली.लोककलेच्या अभिनव सादरीकरणामुळे उपस्थित नागरिकांना शासनाच्या योजनांची माहिती सहज पद्धतीने मिळाली.उत्कृष्ट सादरीकरण बद्दल आयुक्त शेता सिंगल यांनी गोपाल खाडे यांचे कौतुक केले. कार्यक्रमाला सरपंच कल्पना रामेश्वर येवले,उपसरपंच सीमा डोके, जिल्हा परिषद सदस्य डोंगरदिवे,मंडळ अधिकारी निलेश गुगळे तलाठी मंडळातील सर्व तलाठी कृषी विभागाचे श्याम फुके; ज्ञानेश्वर वाळके अनील राणेड; आरोग विभागाचे प्रमोद उपाध्ये सह आरोग्य पथक;स्वस्त धान्य दुकानदार तालुक्यातील मंडळ अधिकारी तलाठी अंगणवाडी सेविकांची उपस्थित होती.खेर्डा मंडळातील गावकऱ्यांचा चांगला प्रतिसाद दिसून आला कार्यक्रमाचे संचालन राहुल वरघट ग्राम महसूल अधिकारी यांनी केले ; प्रास्ताविक कैलास देवरे उपविभागीय अधिकारी यांनी केले तर आभार प्रदर्शन विनोद हरणे नायब तहसीलदार यांनी केले.

**शिबीरात शासनाच्या योजना प्रभावीपणे जनतेपर्यन्त पोहचविने व त्याची अमंलबजावणीही तेवढयाच प्रभावीपणे करणे ह्याच हेतूने समाधान शिबीर घेतले गेले . खेर्डा येथील एकाच कुटूंबातील पांचअसहाय निराधारांना न्याय देण्याचे काम शिबार झाले असल्याने समाधान वाटते .**

**कैलास देवरे**
**उपविभागीय अधीकारी कारंजा**

# कष्टकऱ्यांची लूट करणारा मटका अड्डा दिव्यात खुलेआम सुरू; पोलिसांच्या नाकावर टिच्चून चालतोय अवैध धंदा!

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) दिवा (ठाणे) :** कायद्याचा आणि पोलिसांचा कोणताही धाक न बाळगता दिव्यामध्ये अवैध मटका आणि जुगाराचे अड्डे खुलेआम सुरू असल्याचे विदारक सत्य समोर आले आहे. दिवा-साबेगाव रोडवरील जय भीम स्तंभाजवळ चालणाऱ्या एका मोठ्या जुगार अड्ड्याचे वास्तव एका पुराव्यानिशी उघड झाले असून, यामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या अड्ड्यावर पत्त्यांचे डाव आणि मटक्याचे आकडे लावण्यासाठी परिसरातील तरुणांची, विद्यार्थ्यांची आणि कामगारांची मोठी गर्दी असते. ज्या हातांना काम मिळायला हवे, ते हात आज मटक्याच्या चिठ्ठ्या आणि पत्ते रंगवण्यात गुंग आहेत. विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार वर्दळीच्या रस्त्यावर आणि भरवस्तीत सुरू असतानाही खाकी वर्दीला याची भनक कशी लागली नाही, हा संशोधनाचा विषय आहे. पोलिसांच्या नाकावर टिच्चून सुरू असलेल्या या धंद्यामुळे परिसरातील महिला आणि कुटुंबीय तीव्र संताप व्यक्त करत आहेत.

प्रशासनाने डोळ्यांवर बांधलेली पट्टी लवकरात लवकर काढावी. पोलिसांनी तात्काळ या अवैध धंद्यावर कारवाईचा बडगा उगारला नाही आणि या धंद्यांच्या मुसक्या आवळल्या नाहीत, तर संसाराची राखरांगोळी होत असलेल्या संतप्त महिलांना आणि नागरिकांना न्याय मागण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल, असा स्पष्ट इशारा दिला जात आहे.



# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात नागरिकांना विविध सेवांचे तत्काळ वितरण

## खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार विलास तरे यांच्या अध्यक्षतेखाली मनोर येथे समाधान शिबीराचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर :** शासनाच्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१’ अंतर्गत मनोर येथील लाल बहादूर शास्त्री हायस्कूल व महाविद्यालय येथे खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार विलास तरे यांच्या अध्यक्षतेखाली समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात विविध शासकीय सेवा Single Day Service Delivery माध्यमातून तात्काळ उपलब्ध करून देण्यात आल्या.

या शिबिरास भूसंपादन उपजिल्हाधिकारी महेश सागर, प्रांताधिकारी श्याम मदनुरकर, तहसीलदार रमेश शेंडगे, गटविकास अधिकारी तसेच सर्व तालुकास्तरीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परिसरातील





नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून विविध सेवांचा लाभ घेतला.



शिबिरामध्ये नागरिकांना विविध दाखले, ७/१२ उतारे, ८-अ उतारे यांचे वितरण करण्यात आले. तसेच ७/१२ अद्यावत करणे, ई-मोजणी, पाणंद रस्त्यांबाबत कार्यवाही, अभिलेख दुरुस्ती हेल्पडेस्क, अकृषिक सुधारणा मार्गदर्शन, पीएम किसान योजना, दुय्यम शिधापत्रिका वाटप, प्रलंबित फेरफार निकाली काढणे, तुकडेबंदी कायद्याअंतर्गत कार्यवाही, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ, आरोग्य तपासणी, मोफत डिजिटल सातबारा, वनपट्ट्यावर सातबारा नावे नोंद करणे, लक्ष्मी मुक्ती योजना, प्रॉपर्टी कार्ड आदी विविध सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या.

या उपक्रमामुळे महसूल विभागाशी संबंधित अनेक प्रलंबित प्रश्नांचा तात्काळ निपटारा होत असून नागरिकांना शासकीय सेवा सुलभ, पारदर्शक आणि जलदगतीने मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. शासनाचा हा उपक्रम सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व लाभार्थ्यांसाठी मोठा दिलासा ठरत आहे.

# देवळाली कॅम्प येथे 135 व्या जयंतीनिमित्त जाहीर बैठक

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती देवळाली कॅम्प 2026 च्या वतीने रविवार दिनांक 15 /3 /2026 दुपारी बारा वाजता ठिकाण ज्ञान मंदिर सभागृह बुद्ध विहार देवळाली कॅम्प येथे आयोजित केले आहे देवळाली कॅम्प येथील 8 ही वार्डातील आंबेडकर अनुयायी मंडळे पदाधिकारी कार्यकर्ते व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने विनंती करण्यात आली आहे गेल्या 40 वर्षापासून देवळाली कॅम्प येथे भूतो न भविष्य अशी जयंती समितीच्या वतीने साजरी करण्यात येते जयंतीनिमित्त गेल्या अनेक वर्षापासून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन




केले जाते प्रबोधनात्मक कार्यक्रम साजरे करून हा उत्साह जल्लोषात साजरा करण्यात येतो हीच परंपरा कायम ठेवून याही वर्षी मोठ्या उत्साहात सालाबादाप्रमाणे याही वर्षी ऐतिहासिक जयंती साजरी करण्याकरिता बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे क्रांती निमंत्रक जयंती उत्सव समिती अध्यक्ष शुभम गौतम पगारे पंकज कैलास शेजवळ तसेच आयोजक परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# हाणेगाव येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व. अभियानास उस्फूर्त प्रतिसाद

महाराष्ट्र जीत

**(देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने) :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागरिकांना महसूल, सामाजिक सुरक्षा योजना ,मोजणी व इतर शासकीय सेवा अधिक लोकाभिमुख कार्यक्षम आणि गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्हा अधिकारी राहुल कर्डिले व उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर तहसील कार्यालयाचे तहसीलदार भरत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हाणेगाव येथे श्री छत्रपती महाराज महाराज शिबिराचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष देगलूर उपविभागीय अधिकारी अनुप पाटील व देगलूर तहसील चे तहसीलदार भरत सूर्यवंशी, देगलूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, प्रीतम देशमुख तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी ,बालाजी उमाटे विस्तार अधिकारी पंचायत समिती, देगलूर, स्नेहल गंदीगुडे पुरवठा विभाग तहसील देगलूर, हाणेगाव नगरीचे सरपंच सौ शारदादेवी शंकरराव राठोड, ग्रामविकास अधिकारी अमोल जाधव, दिलीप बंदखडके माजी जिल्हा परिषद सदस्य, उपसरपंच मुजीपोदिन चमकुडे, बालाजी इंगळे तालुकाध्यक्ष शिवसेना उ, बा, ठा, आधी जण उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक देगलूरचे तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी उपस्थित नागरिकांना सविस्तर असे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत आलेल्या सर्व योजनांची सविस्तर अशी माहिती सांगितली व सर्व नागरिकांना मिळणाऱ्या तहसीलच्या सर्व व तसेच इतर योजना विषयी माहिती सांगितली तर देगलूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी पंचायत समितीच्या विविध योजनांची माहिती यावेळी सांगण्यात आली व तसेच आरोग्यविषयक विविध



योजनांची माहिती यावेळी सांगण्यात आली कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांनी शासनाच्या मिळणाऱ्या सर्व सोयी सुविधा योजना याविषयी सविस्तर अशी माहिती दिली यावेळी बळीराजा पानद रस्ता, भूविकास बँकेचा बोजा, गायरान जमिनीचे वर्ग दोन चे एक करणे, एसआयआर सर्वेसाठी कर्मचाऱ्यांना सकारात्मक सहकार्य करावे आसे सांगितले यावेळी उत्पन्न ,जातीचे ,आणि रहिवासी प्रमाणपत्र दोनशे ते अडीचशे वाटप करण्यात आले व तसेच महिला बाल विकास यांचे पाचशे ते साडेपाचशे ५५० प्रमाणपत्र वाटप करण्यात आले भूविकास बँकेचे, तसेच भूमि अभिलेख ,व सातबारा दुरुस्ती ,रोजगार पत्रक, आदी प्रमाणपत्राचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले यावेळी प्रश्न पशुसंवर्धन विभाग यांच्याकडून डॉक्टर प्रेषित बिरादार पशुधन विकास अधिकारी देगलूर डॉक्टर शिवाजी कानगुले सहाय्यक पशुधन अधिकारी देगलूर व तसेच दुय्यम निबंधक कार्यालय देगलूर यांच्याकडून जयशंकर सरडे दुय्यम निबंधक कार्यालय देगलूर आर जी मंगरूळे कनिष्ठ लिपिक देगलूर व पुरवठा विभाग , संजय गांधी निराधार, तसेच महिला बाल विकास देगलूर यांच्याकडून रफी मोहम्मद शेख संरक्षण अधिकारी बाल संगोपन योजना देगलूर, तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडून किरसंबरे, सौ पळनि टकर एल एच व्ही, सौ छाया भोरगे, व आपले सरकार केंद्र हाणेगाव यांच्याकडून प्रशांत संतपुरे ,सतीश बिरादार, यांनी काम पाहिले हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हाणेगाव सज्याचे ग्राम महसूलअधिकारी महेश पदाजी व मंडळ अधिकारी लक्ष्मण बेंजलवार यांच्या सर्व साथीदार कर्मचारी यांच्या अथक परिश्रमामुळे कार्यक्रम हा फार मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला अशी चर्चा ऐकायला मिळत होती यावेळी हनेगाव परिसरातील खुतमापूर, कुडली, येडूर, बी जलवाडी कोकलगाव ,रमतापूर ,तुंबरपळी, शिळवणी, वझर, कामाजीवाडी, आधी गावचे सरपंच नागरिक पोलीस पाटील शेतकरी सर्व वाटप करण्यात येणारे प्रमाणपत्र धारक उपस्थिती होती व तसेच या कार्यक्रमाला नायब तहसीलदार रायवार गणेश तसेच या परिसरातील ग्राम महसूल अधिकारी पुजारी नंदकुमार, वंजे सोमनाथ ,शितोळे वर्षा ,गायकवाड सोना ,बिरादार दिव्या ,सहाय्यक कृषी अधिकारी वल्कले नवनाथ, तालुका कृषी अधिकारी कावटवाड सुरेश उपक्रषी अधिकारी जमखंडे मुक्तांजली व हानेगाव येथील सर्व आशाताई व सर्व अंगणवाडी ताई उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल जाधव ग्राम विकास अधिकारी हानेगाव यांनी केले तर आभार हाणेगावचे मंडळ अधिकारी लक्ष्मण बेंजलवार यांनी केले.

## देगलूर येथे संभाजी ब्रिगेडचा पदनियुक्ती व पक्षप्रवेश सोहळा उत्साहात; भगवान काळे पाटील यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने :** देगलूर येथील शासकीय विश्रामगृहात संभाजी ब्रिगेडच्या वतीने पदनियुक्ती व पक्षप्रवेश सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात देगलूर तालुक्यातील विविध गावांमधून आलेल्या अनेक पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी संभाजी ब्रिगेडमध्ये प्रवेश करून संघटनेला बळकटी दिली.



कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे (करडखेडवाडीकर), जिल्हा उपाध्यक्ष संतोष चिद्रावार लोणीकर, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी जाधव (अंदेगावकर), जिल्हा संघटक दत्ता पाटील केरूरे (सुगावकर), विधानसभा अध्यक्ष देविदास थडके तसेच तालुकाध्यक्ष शहाजी बाबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.मान्यवरांनी संभाजी ब्रिगेडच्या विचारधारेविषयी मार्गदर्शन करत संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले.

यावेळी देगलूर तालुक्यातील विविध पदांसाठी पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. त्यामध्ये लोणी येथील सामाजिक कार्यकर्ते भगवान काळे पाटील यांची संभाजी ब्रिगेडच्या देगलूर तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच हणमंत पाटील कोसंबे यांची तालुका कार्याध्यक्षपदी, व्यंकट नरवाडे करडखेडकर यांची शिक्षक आघाडी अध्यक्षपदी, तानाजी सुकनाळे मरतोळीकर यांची शिक्षक आघाडी कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

तसेच नरसिंग तुकाराम अन्नमवार यांची हणेगाव सर्कल प्रमुखपदी, शहाजी मुदिराज (कु.वाडी) यांची करडखेड सर्कल प्रमुखपदी तर जगदीश जाधव हाळीकर यांची देगलूर तालुका सचिवपदी निवड जाहीर करण्यात आली.या सोहळ्यात झरी, रामपूर, सोमूर, करडखेड, बेबंरा, सावरगाव तसेच परिसरातील इतर गावांमधील विविध पक्षांचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संभाजी ब्रिगेडमध्ये पक्षप्रवेश करून संघटनेशी निष्ठा व्यक्त केली. नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे मान्यवरांनी स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी संघटनेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या प्रश्नांवर ठामपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## भगूर येथील ऐतिहासिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी पोपटराव सोनवणे

महाराष्ट्र जीत

**भगूर प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक भीम जयंती उत्सव विजयनगर, जयंती अध्यक्ष पोपट भाऊ सोनवणे यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली. सुभेदार रामजी आंबेडकर कला क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ विजयनगर कार्यक्रमाचे अध्यक्ष आर डी भाऊ जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मीटिंग संपन्न झाली तसेच महिला शालिनीताई पगारे,सुमन सोनवणे,शारदा चंद्रमोरे सुनीता भवार, आशा गांगुर्डे, मनीषा गांगुर्डे, मीना गायकवाड, मनीषा गरुड, अर्चना पान पाटील, काजल पवार व तसेच मंडळातील सदस्य माझी जयंती अध्यक्ष राजेंद्र श्रीवंत सर,सुनील उन्हवणे सर, आर डी भाऊ जाधव, पुंडलिक गांगुर्डे, सुरेश गरुड, संजय जगताप, राजू सोनवणे, अजय भालेराव, अजित गवारे, चेतन दोंदे, अनिकेत साळवे, योगेश गरुड, विजय साळवे साहिल जाधव, मनोज पाखरे, सागर



जयंती अध्यक्ष



कार्याध्यक्ष

गायकवाड, सागर गांगुर्डे, तुषार भवार, सतीश पवार, अभिषेक श्रीवंत, अभी कहार...

उपाध्यक्ष: अक्षय वसंत साळवे
खजिनदार : अजिंक्य गौतम भवार
सखजिनदार : रंजन वाल्मीक पवार
मिरवणूक अध्यक्ष : विलास सुरेश गरुड
कार्याध्यक्ष: अशोक भाऊ सदावर्ते
सल्लागार : आर डी भाऊ जाधव / शरद भाऊ उबाळे

## नारायण सुर्वे : कामगार वर्गाचा कवी आणि लोकसंघर्षांचा आवाज

मुंबईची कामगार वस्ती, गिरण्यांचा गुंज, भरकटलेली स्वप्न, रोजच्या लढाया आणि उद्याची आशा - सुर्वेंची कविता या सगळ्या वास्तवांची साक्ष देणारी.

मराठी साहित्यात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांचे आयुष्य हेच त्यांच्या लेखनाचे विद्यापीठ ठरते. नारायण सुर्वे हे त्यापैकी एक तेजस्वी नाव. १५ ऑक्टोबर १९२६ रोजी जन्मलेले आणि १६ ऑगस्ट २०१० रोजी अनंतात विलीन झालेले सुर्वे हे फक्त कवी नव्हते, तर कामगारांच्या जगण्याचे विश्व त्यांनी शब्दबद्ध केलेला एक लोककवी होते. शहरी झोपडपट्ट्यांपासून गिरण्यांच्या भडक वातावरणापर्यंत, त्यांनी अनुभवलेली प्रत्येक वेदना, आर्तता आणि आशा त्यांच्या कवितेतून झळाळून दिसते.

**अत्यंत प्रतिकूलतेत गेलेले बालपण**

सुर्वेंचे बालपण हे संघर्षांची साखळी होती. पालकत्व न लाभलेल्या या मुलाचे पालनपोषण मुंबईतील गिरणी कामगारांच्या वस्तीत झाले. आयुष्याच्या या प्रारंभिक टप्प्यानेच त्यांच्या कवितेला वास्तवाची ताकद, कष्टकऱ्यांच्या मनाचा नाद आणि सामाजिक वेदनांची धार मिळाली.

**नोकऱ्यांचा प्रवास आणि अनुभवांची शिदोरी**

त्यांचा रोजगारप्रवासही तेवढाच कठोर—हॉटेलमधील कामगार, गिरणीत बिगारी, शिपाई, आणि पुढे प्राथमिक शाळेत शिक्षक. या विविध अनुभवांनी त्यांची कविता अधिक मानवी, अधिक जमिनीवरची आणि अधिक जिवंत बनवली. ‘लोकांमध्ये राहून लोकांसाठी लिहिणे’ हेच त्यांच्या लेखनाचे मुख्य तत्त्व होते.

**कामगार वर्गाच्या जीवनाचे काटेकोर चित्रण**

मुंबईची कामगार वस्ती, गिरण्यांचा गूंज, भरकटलेली स्वप्ने, रोजच्या लढाया आणि उद्याची आशा—सुर्वेंची कविता या सगळ्या वास्तवांची साक्ष देणारी. त्यांच्या लेखणीतून आकार घेतलेल्या "नालबंदवाला याकूब" किंवा "गोदीवर काम करणारा अफ्रिकन चाचा" यांसारख्या व्यक्तिरेखा आजही मराठी साहित्यातील जिवंत चेहऱ्यांप्रमाणे उभ्या राहतात.

**मार्क्सवादी विचारांचा ठसा**

सुर्वेंच्या कवितांवर मार्क्सवादी विचारसरणीचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. समाजपरिवर्तन, समानता, स्वाभिमान आणि संघर्ष या त्यांच्या कविता केवळ शब्दांची मांडणी नसून विचारांना दिशा देणारे दर्पण ठरतात. त्यांनी साहित्याला वर्गसंघर्षाचे तत्त्वज्ञान दिले, आणि कवितेला रस्त्यावर उतरवून लोकांचे हक्क सांगण्यासाठी सज्ज केले.

**प्रमुख काव्यसंग्रह**

माझे विद्यापीठ (१९६६) – स्वतःच्या आयुष्याला विद्यापीठ मानणारा कवी.

जाहिरनामा – समाजपरीवर्तनाच्या लढ्याची हाक.

नालबंदवाला याकूब – उपेक्षित लोकांच्या आयुष्याचा धगधगता दस्तऐवज.

**पद्मश्री सन्मान (१९९८)**

साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यगौरव म्हणून भारत सरकारने १९९८ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. हा सन्मान कामगारांच्या वेदना आणि आकांक्षा लिहिणाऱ्या कवीच्या शब्दांना मिळालेली राष्ट्रीय पातळीवरील दखल होती.

**सुर्वे यांच्या नावाची कलाअकादमी**

त्यांच्या निधनानंतरही सुर्वेंचे कार्य तितक्याच तेजाने प्रेरणा देत राहिले. तळागाळातील कलाकारांना व्यासपीठ मिळावे यासाठी ‘नारायण सुर्वे कला अकादमी’ची स्थापना करण्यात आली—समाजासाठी लिहिणाऱ्या कवीच्या वारशाला दिलेली ही सन्मानाची सलामी.

**लेखक : प्रसाद हनुमंते,पनवेल**
**पद्मश्री नारायण सुर्वे साहित्य गौरव ग्रंथ समिति**

महाराष्ट्र जीत

## देगलूर येथे १५ मार्च रोजी बौध्द धम्म परिषदेचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**देगलूर देगलूर/संघपाल मदने :** देगलूर शहरात पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद दि.१५ मार्च २०२६ रविवार रोजी चिद्रावार जिनिंग मिल मैदान उदगीर रोड, देगलूर येथे पुज्य भदन्त धम्मसेवक महास्थवीर (मुळावा) यांच्या अध्यक्षतेखाली महाउपासक डॉ.एस. पी.गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली. असून धम्म परिषदेचे उद्घाटन पुज्य भिख्खू करूणानंद महाथेरो (छ.संभाजीनगर) यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती धम्म परिषदेचे संयोजक धोंडीबा कांबळे मिस्त्री यांनी दिली आहे.




नांदेड जिल्ह्यातील तेलंगणा व कर्नाटक राज्य सिमेवरील देगलूर येथे विश्वाला शांतीचा संदेश देणारे महाकारूणीक तथागत गौतम बुद्धांनी दिलेल्या धम्माचा मार्ग समजून घेण्यासाठी अनेक अभ्यासू भिख्खू संघातील भंन्तेजीना निमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या उपस्थितीत दि.१५ मार्च २०२६ रविवार रोजी पहिली एकदिवसीय अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद देगलूर येथे आयोजित करण्यात आली आहे. धम्म परिषद कार्यक्रम रूपरेषा नागार्जुन बुद्ध विहार सिध्दार्थनगर येथे त्रिरत्न वंदना व परित्राण पाठ पहाटे ५ : ३० ते ६ : ३० पर्यंत तर पंचशील धम्म ध्वजारोहण सकाळी ७ : ३० वाजता करण्यात येईल व समता सैनिक दलाच्या वतीने धम्मध्वजास मानवंदना देण्यात येणार आहे. तसेच नागार्जुन बुद्ध विहार येथून सकाळी ८ : ३० वाजता ३५० फूट धम्मध्वज रॅली भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक मार्गे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मारक ते धम्म परिषदेचे ठिकाणी चिद्रावार मिल उदगीर रोड पोहचेल्यानंतर धम्म परिषद स्थळी धम्म ध्वजारोहण करण्यात येणार असून उपस्थित पुज्य भिख्खू संघास दुपारी ११ ते १२ वाजेपर्यंत भोजनदान दिले जाणार आहे.

धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी पुज्य भदन्त धम्मसेवक महास्थवीर (मुळावा) अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भिख्खू संघ, पुज्य भदन्त करूनानंद महाथेरो (महाकारूणीक बुध्दीस्ट मोनेस्ट्री, साजापूर संभाजीनगर औरंगाबाद), पुज्य भदन्त ग्यानरक्षित महाथेरो (अध्यक्ष, मैत्रेय चॅरिटेबल ट्रस्ट, संभाजीनगर औरंगाबाद), पुज्य भदन्त महाविरो

थेरो(राष्ट्रीय उपाध्यक्ष भिख्खू संघ,लातूर), पुज्य भदन्त धम्मशिल थेरो बिड, या प्रमुख भिख्खू संघाची धम्मदेसना दुपारी १ ते रात्री १० वाजेपर्यंत होईल तर भंन्ते संघपाल थेरो नांदेड, भिक्खूणी चारुशीला नांदेड, भंन्ते रेवतबोधी जिंतूर, भंन्ते ज्ञानज्यती मानूर, भंन्ते बुध्दभुषण दाभड, भिख्खू पय्यवर्धन हिंगोली, भिख्खू पय्यारक्षित पुणे, भिख्खू संघरत्न परभणी यांच्यासह अनेक भिक्खूंची उपस्थिती लाभणार असल्याचे संयोजक धोंडीबा मिस्त्री कांबळे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे. उपासक उपासिकांनी हजारोंच्या संख्येने धम्मपरिषदेस सहभागी व्हावेत व येताना शुभ्र वस्त्र परिधान करून यावे असे हि आवाहन करण्यात आले आहे.धम्म परिषदेचे संयोजक धोंडीबाजी कांबळे मिस्त्री, किशन वनंजे,संजय कांबळे, सतिश पांडवे, सुरज कांबळे, गजुभाऊ कांबळे, सचिनजी कांबळे,व्यंकट बोरगावकर,राहुल बेम्बरेकर, भीम भुताने, रामा माणिकमोते शीलाताई कच्छरे,शोभाताई कांबळे, नागरबाई कांबळे आदी धम्म परिषद यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

## दारव्हा शहरातील पुलाचे व नाल्याचे काम करीत असतांना बॅरिगेट लावूनच काम करा.बहुजन मुक्ती पार्टीची मागणी

महाराष्ट्र जीत

**प्रशांत ठाणे :** दारव्हा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परीक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरवण्यासाठी अनुदान योजने अंतर्गत नगर परिषद हद्दीतील रेल्वे क्रॉसिंग पूल ते गोळीबार चौका पर्यंत नाल्याचे व पुलाचे बांधकाम करण्याचे काम सध्या नातुवाडीच्या मागच्या बाजूस व इतर नगरातून सुरु आहे.परंतु पुलाचे बांधकाम करीत असतांना पुलाच्या खड्डयाच्या आजू बाजूला बॅरिगेट लावून कव्हर करायला पाहिजे होते मात्र बांधकाम कंत्राटदाराने असे कोणतेही बॅरिगेट लावून पुलाला कव्हर केल्याचे दिसून येत नाही.परंतु मागील वर्षी ऑगस्ट 2025 मध्ये असेच रेल्वे पुलाचे काम सुरु असतांना कंत्राटदाराच्या हलगर्जी पणामुळे चार मुलांना जीव गमवावा



लागला त्यामुळे त्वरित पुलाचे काम सुरु असलेल्या ठिकाणी बॅरिगेट लावून कव्हर करूनच कंत्राटदाराने काम करावे तसे न केल्यास व काही अनुचित प्रकार घडल्यास ह्याला जबाबदार कंत्राटदार राहील. याकरिता जिल्हाधिकारी यवतमाळ व पालकमंत्री यवतमाळ जिल्हा यांच्या माहितीस्तव बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने बिमोद मुधाने यांनी कळविले आहे..

दैनिक महाराष्ट्र जीत
रविवार, १५ मार्च २०२६



# व्हिएतनाम येथील विश्व साहित्य संमेलनासाठी व व्हिएतनाम या देशाचा अभ्यास दौरा करण्यासाठी सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .राहुलजी म्हस्के यांची निवड

महाराष्ट्र जीत



**जाफराबाद तालुका प्रतिनिधी :** व्हिएतनाम येथील विश्व साहित्य संमेलनासाठी जाफराबाद येथिल सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ.राहुलजी म्हस्के व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ.सविता राहुल म्हस्के यांना जागतिक आंबेडकरवादी साहित्य मंडळातर्फे २१ व २२ मार्च २०२६ रोजी व्हिएतनाम या देशाची राजधानी " हनोई " येथे सहावे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन होत असुन या संमेलनात सहभागी होऊन " जागतिक महायुध्द आणि आंबेडकरवादी लेखकांची भूमिका या विषयावर आपले विचार व्यक्त करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.या विश्व साहित्य संमेलनात आंबेडकरवादी विश्व साहित्य आणि जगातील वंचितांचे प्रश्न, आंबेडकरवादी स्त्रीवाद आणि जगातील ईतर स्त्रियांचे साहित्य या विषयावर होणाऱ्या साहित्य संमेलनात सुध्दा सहभागी होणार आहेत.प्राचार्य डॉ.राहुलजी म्हस्के व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ.सविता म्हस्के यांना व्हिएतनाम या देशाची राजधानी"हनोई "या ठिकाणी होणाऱ्या विश्व साहित्य संमेलनात डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कारांने सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांच्या या दौऱ्यासाठी सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के, संस्थेचे उपाध्यक्ष मा.भारतभाऊ म्हस्के, संस्थेचे कोषाध्यक्ष मा.सुनीलभाऊ म्हस्के, संस्थेच्या सर्वच हायस्कूलच्या कर्मचारी बंधु- भगिनींनी तसेच सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद येथिल उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी बंधु-भगिनी, सामाजिक, शैक्षणिक, व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी प्राचार्य डॉ राहुलजी म्हस्के यांना व्हिएतनाम येथील विश्व साहित्य संमेलनासाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले जात आहे.या अगोदरही डॉ.राहुलजी म्हस्के यांना ( U.A.E ) संयुक्त अरब अमिराती देशातील दुबई व थायलंड,तसेच बॅंकोक येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत आंतरराष्ट्रीय पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले होते.प्राचार्य डॉ.राहुलजी म्हस्के सरांचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.

# धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी आमदार विनोद अग्रवाल यांचे प्रयत्न यशस्वी; सरकारकडून ₹208.88 कोटींची निधी मंजूर

## ३१ जानेवारीपर्यंत धान विकलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच रक्कम जमा होणार

महाराष्ट्र जीत

**गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्याचे आमदार विनोद अग्रवाल हे सातत्याने शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित मुद्दे विधानसभेत मांडत आले आहेत. जनहित तसेच विशेषतः शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत सक्रिय राहणारे आमदार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. धान उत्पादक जिल्हा म्हणून गोंदिया येथील शेतकऱ्यांना धानाचे चुकारे वेळेवर मिळावेत, यासाठी त्यांनी विधानसभेत सरकारचे लक्ष वेधले होते.



आमदार विनोद अग्रवाल यांनी हा मुद्दा गांभीर्याने घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या थकीत देयकांच्या तातडीने भुगतानाची मागणी केली होती. तसेच राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबल यांच्याशीही चर्चा करून धान उत्पादक शेतकऱ्यांना लवकरात लवकर पैसे देण्याची मागणी केली होती. या प्रयत्नांचे फलित म्हणून राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या थकीत देयकांच्या भुगतानासाठी ₹२०८ कोटी ८८ लाखांची निधी मंजूर केली आहे. या निधीमधून सुमारे २५ लाख १५ हजार क्विंटल धानाचे चुकारे शेतकऱ्यांना अदा करण्यात येणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार ३१ जानेवारीपर्यंत धान विक्री केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच रक्कम जमा करण्यात येणार आहे. तसेच सुमारे ५० हजार क्विंटल धानाचे चुकारे अद्याप प्रलंबित आहेत, तेही ३१ मार्चपर्यंत शेतकऱ्यांना मिळावेत यासाठी आमदार विनोद अग्रवाल प्रयत्नशील आहेत. याशिवाय शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी धान खरेदीची मर्यादा (लिमिट) वाढविण्याची मागणीही आमदार विनोद अग्रवाल सातत्याने करत आहेत.

शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेल्या या प्रयत्नांमुळे आमदार विनोद अग्रवाल सध्या चर्चेत असून शेतकऱ्यांमध्ये लवकरच सर्व थकीत देयके मिळतील, अशी अपेक्षा निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेल्या या निर्णयाबद्दल आमदार विनोद अग्रवाल यांनी राज्य सरकारचे आभार मानले असून प्रलंबित मागण्याही शेतकऱ्यांच्या हितासाठी लवकर पूर्ण करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच शेतकऱ्यांनीही या प्रयत्नांसाठी आमदार अग्रवाल यांचे आभार मानले आहेत.

# नागपूर पोलिसांचा AI चा स्मार्ट वापर; तक्रार नोंदणी आता २–६ मिनिटांत, नागरिकांचा वेळ वाचणार

महाराष्ट्र जीत

जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहर पोलिसांनी तक्रार नोंदणी प्रक्रिया अधिक जलद आणि सुलभ करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित प्रणाली सुरू केली आहे. या नव्या प्रणालीमुळे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यास लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला असून नागरिकांना जलद सेवा मिळू लागली आहे.

पोलीस उपआयुक्त (परिमंडळ क्र. ४) रश्मिता राव (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. पोलीस ठाणे नंदनवनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांनी Voice Typing, WhatsApp आणि उपलब्ध तांत्रिक साधनांचा वापर करून ही प्रणाली तयार केली आहे. विशेष म्हणजे, यासाठी कोणतेही नवीन ॲप तयार करण्यात आलेले नसून उपलब्ध साधनांचा प्रभावी वापर करण्यात आला आहे.

पूर्वी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविणे, प्रिंट काढणे आणि नोंदी CCTNS प्रणालीमध्ये अपलोड



करण्यासाठी बराच वेळ लागत होता. त्यामुळे नागरिकांना प्रतीक्षा करावी लागत असे आणि पोलीस कर्मचाऱ्यांवरही प्रशासकीय कामाचा ताण वाढत होता. मात्र आता AI प्रणालीमुळे ही प्रक्रिया अधिक वेगवान झाली आहे.

**नव्या प्रणालीमुळे लागणारा वेळ :**

अदखलपात्र गुन्हा (NC) नोंद : पूर्वी १० मिनिटे – आता २–३ मिनिटे

चोरीची फिर्याद : पूर्वी १५–२० मिनिटे – आता ३–६ मिनिटे

मोबाइल/वस्तू मिसिंग : पूर्वी २०–२५ मिनिटे – आता ३–६ मिनिटे

अटक मेमो : पूर्वी १५ मिनिटे – आता २–३ मिनिटे

दैनंदिन हजेरी नोंद : पूर्वी १५ मिनिटे – आता २–३ मिनिटे

या प्रणालीमुळे तक्रार नोंद प्रक्रिया जलद झाली असून तक्रारींची प्रतीक्षा कमी झाली आहे. तसेच CCTNS प्रणालीमध्ये नोंदी टाकताना होणारा वेळही मोठ्या प्रमाणात वाचत आहे. यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचा प्रशासकीय कामाचा ताण कमी झाला असून प्रत्यक्ष पोलिसाना कामावर अधिक लक्ष केंद्रित करता येत आहे.

महत्त्वाचे म्हणजे, ही प्रणाली वापरण्यास अत्यंत सोपी असून त्यासाठी विशेष प्रशिक्षणाचीही आवश्यकता नाही. त्यामुळे सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सहजपणे याचा वापर करू शकतात. सदर प्रणालीची अंमलबजावणी प्रादंभी नंदनवन पोलीस ठाणे येथे प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आले असून त्यानंतर परिमंडळ क्रमांक चार मधील उर्वरित पोलीस ठाणे सक्करदरा, इमान वाडा, हुडकेश्वर, अजनी, व बेलतरोडी येथे देखील सुरू करण्यात आले आहे. त्याकरिता पोलीस निरीक्षक श्री कैलास देशमाने पोलीस ठाणे नंदनवन यांनी मंडळातील एकूण 165 महिला आमदार यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले आहे सदर प्रणाली सीसीटीएनएस चे काम करणाऱ्या महिला आमदार यांचे कामांमध्ये वेळेमध्ये प्रभावी सुधारणा झाली आहे सदर प्रणाली ही महिला दिनाचे औचित्य साधून सुरू करण्यात आली असून त्यामध्ये सर्व प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे व पोलीस ठाणे मधील सर्व महिला अंमलदार यांना या प्रणाली बाबत अवगत करण्यात आले ही बाब उल्लेखनीय आहे. सी सी टी एन एस ही प्रणाली मंगल फॉन्ट मध्ये असल्याने ती सर्वांना येत नव्हती त्याचाही अडथळा दूर करण्यात आला असून सर्व महिला कर्मचाऱ्यांना सक्षम बनविण्यात आले. सर्व महिला सीसीटीएनएस चा कार्यभार सांभाळू शकतात पुढे परिमंडळातील सर्व पुरुष आमदार यांना असेच प्रशिक्षण देऊन सक्षम बनविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे नागपूर पोलिसांचे कामकाज अधिक जलद, सुलभ आणि कार्यक्षम झाले असून नागरिकांनाही तक्रार नोंदविताना मोठा दिलासा मिळत असल्याचे पोलीस उपआयुक्त रश्मिता राव यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय समाजप्रेमी राजहंस वाढे सर यांना पुरस्कार सन्मानित

महाराष्ट्र जीत

**उल्हासनगर :** जप जीवाला बहुउद्देशीय संस्था निती आयोग आय एस ओ संस्था संस्थापक अध्यक्ष माननीय एन.ए.कदम सर यांनी राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा महाराष्ट्र राज्य मध्ये विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या समाजकार्याची कार्य बघून पोलीस मित्र आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजहंस वाढे यांना समाज प्रेमी पुरस्कार सन्मानित करण्यात आला आहे.. ठाणे जिल्हा टिटवाळा येथे अक्कलकोट स्वामी समर्थ प्रतिष्ठान येथे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा पुस्तके प्रकाशन सोहळा उत्साह संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय अरुण सर स्वागत अध्यक्ष किसन बोंद्रे सर. किशोरजी. सुनंदा विष्णू कुडव अध्यक्ष. कुणबी समाज उन्नती संघ शहापूर तुकाराम नाना .सुरेखा दत्तात्रय मुंडकर अधिकारी शहापूर .पद्माकर दाजी वळवी स्वामी समर्थ केंद्र केंद्रली तालुका मुरबाड रामकृष्ण भेरे माजी सरपंच ग्रामपंचायत बिरवाडी तालुका शहापूर ठाणे सामाजिक कार्यकर्ता कमलाकर शंक तुला लक्ष्मण मुळे गुरुजी कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील 38 जणांना शाल सन्मानपत्र स्मृतिचिन्ह भेटवस्तू देऊन सत्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला. अध्यक्षीय भाषणात सर्व पुरस्कारांच्या अभिनंदन करून आपले विचार मांडत असताना पुरस्कारांसाठी योग्य निवड करून स्वामींच्या




ठिकाणी सत्कार सोहळा कार्यक्रम कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल व संस्था विविध उपक्रम हाती घेऊन राबवीत आहे त्याबद्दल संस्थेचे कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आगामी कार्यक्रमास शुभेच्छा व्यक्त केल्या पुस्तक प्रकाशन व पुरस्कार सोहळा यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी नितीन हरडा डोंबिवली मिलिंद जी मोरे वेदांत कदम मानस कदम गजानन किस्मतराव सुभाष शिंदे डोळा खांबकर एडवोकेट विलास भारती राहुल जी मुंडे यांनी आता दर्शना जोशी मीनाक्षी अहिरे परिश्रम घेतले या.. राजहंस वाढे सर यांना पूर्ण महाराष्ट्र राज्य मधून शुभेच्छा फेसबुक गुगल इन्स्टा च्या माध्यमातून शुभेच्छा देण्यात आले आहे.सोहळ्याला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन . राष्ट्रीय निवेदिका सो करून सचिन गंगे- बांगर व मुकेश दामोदर सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गजानन किस्मतराव यांनी केले आहे..

# उमरखेड बायपासवर ट्रॅफिक पोलिसांकडून वाहनधारकांना अडवण्याच्या तक्रारी ; खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची अचानक पाहणी

महाराष्ट्र जीत

**हदगाव| प्रतिनिधी :** उमरखेड बायपास हायवेवर काही ट्रॅफिक पोलिस कर्मचारी सतत तळ ठोकून येणाऱ्या-जाणाऱ्या छोट्या-मोठ्या वाहनधारकांना विनाकारण अडवून त्रास देत असल्याच्या तक्रारी वाहनधारकांकडून वारंवार प्राप्त होत होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार मा. नागेश पाटील आष्टीकर यांनी आज अचानक त्या ठिकाणी भेट देत परिस्थितीची पाहणी केली.

पाहणीदरम्यान चार-पाच वाहनधारकांना अडवून ठेवलेले आढळल्याने खासदारांनी संबंधित ट्रॅफिक पोलिस कर्मचाऱ्यांना जाब विचारला. उमरखेड शहरात वाहतुकीची मोठी समस्या असताना योग्य नियोजन न करता बायपासवर वाहनधारकांना अडवून त्रास देणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

तसेच नागरिकांना विनाकारण अडवणे, धाक दाखवणे किंवा त्रास देणे सहन केले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही तात्काळ सूचना दिल्या. नागरिकांशी संयमाने व कायद्याच्या चौकटीत वागण्याचे आदेश त्यांनी दिले.

जनतेच्या तक्रारींना प्रतिसाद देत घटनास्थळी जाऊन प्रशासनाला जाब विचारण्याची खासदारांची कार्यशैली ही त्यांच्या जनतेशी असलेल्या बांधिलकीची साक्ष देणारी असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# नाशिक जिल्हा कॅरम स्पर्धा आणि निवड चाचणीचे उद्या दिनांक १५ मार्च रोजी आयोजन

महाराष्ट्र जीत

**निफाड क्रीडा प्रतिनिधी/:** नाशिक जिल्हा कॅरम असोसिएशनच्या वतीने आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या सहकार्याने नाशिकच्या मिनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुल येथे उद्या रविवार दिनांक १५ मार्च, २०२६ रोजी रोजी १२ वर्षे आणि १४ वर्षे वयोगट मुले आणि मुली यांच्या जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा आणि निवड चांचणीचे आयोजन करण्यात आले आहे. १५ मार्च, २०२६ रोजी सकाळी ०९.३० वाजता या स्पर्धेला प्रारंभ होईल. १२ वर्षे गटासाठी खेळाडूंची जन्म तरिख १६ मार्च, २०१४ किवा त्यानंतरची असावी तर १४ वर्षे वयोगटासाठी खेळाडूंची जन्म तारीख १६ मार्च २०१२ किवा त्यानंतरची असावी. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे खेळाडूंची नाशिक जिल्हा संघासाठी निवड केली जाणार आहे. हे निवड झालेले खेळाडू दिनांक २६ मार्च, २०२६ दरम्यान मुंबई दादर येथे आयोजित *५९ व्या महाराष्ट्र राज्य कॅरम* स्पर्धेत नाशिक जिल्ह्यातर्फे सहभागी होतील. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी रविवार दिनांक १५ मार्च रोजी सकाळी ०९. ०० वाजता स्पर्धा स्थळी उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी भूषण भटाटे मो क्रमांक ८९९९९६८५८४, अभिषेक मोहिते मो क्रमांक ९७६३६०६१८७ यांच्याशी संपर्क साधावा.कृपया आपल्या संस्थेच्या, महाविद्यालयाच्या, शाळेच्या खेळाडूंना या स्पर्धेत सहभागी करून घ्यावे असे आवहान जिल्हा कॅरम अशोकचे पदाधिकारी अशोक दुधारे, अशोक कचरे, आनंद खरे यांनी केले आहे.



# कलाकारांच्या न्याय हक्कासाठी लढा व संघर्ष करणे आमचे कार्य - पत्रकार संजीव भांबोरे

महाराष्ट्र जीत

भंडारा कलाकार हे ग्रामीण भागातून तयार होत असतात व त्यांची कला म्हणजे कला असते कलेची कदर सरकारने घ्यावी त्यांना होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाटप होऊ नये हे आमचे कर्तव्य आहे असे मत पत्रकार संजीव भांबोरे यांनी दोन दिवसीय ( शनि. ०७ व रवि. ०८ मार्च ) ला विदर्भ स्तरीय लोककला मेळाव्यात साकोली येथील होमगार्ड परेड ग्राउंड येथे सत्कार प्रसंगी आपले मत व्यक्त केले.

याप्रसंगी विदर्भस्तरीय लोककला महोत्सवाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश काळे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथीत सभापती शितल राऊत, नगराध्यक्ष देवश्री कापगते, महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त पत्रकार डी जी रंगारी, ताराचंद कापगते, ग्रामसेवक विनोद भेंडारकर, नगरसेवक वैशाली लांजेवार, सायली दोनोडे, सरपंच पुरुषोत्तम रुखमोडे, धनवंता राऊत, प्रेस संपादक जिल्हाध्यक्ष आशिष चेडगे, श्रीकांत नागदेवे, जेष्ठ कलावंत प्रबोधनकार अंबादास नागदेवे, तनुजा नागदेवे, विठ्ठल लांजेवार, अध्यक्ष उमेश बोरकर, शाहीर भगवान लांजेवार, शैलेश गजभिये, अभय बनसोड बी. टी. गजभिये, नारायण ऊके, शितल नागदेबे व इतर मान्यवर उपस्थित होते. येथे ज्यांचे सामाजिक क्षेत्रात फार मोठे योगदान आहे अशांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आला. यात प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश काळे, पत्रकार डी. जी. रंगारी, ताराचंद कापगते, अभय बनसोड, उमेश बोरकर, नगरसेवक वैशाली लांजेवार, ग्रामसेवक विनोद भेंडारकर, सरपंच पुरुषोत्तम रुखमोडे व इतर मान्यवरांच्या सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कलाकारांना मार्गदर्शन करताना कलाकारांनी संघटितपणे काम करून आपल्या क्षेत्रात प्रगती करावी व अन्याय अत्याचाराचे विरोधात लढा द्यावा व आपली मागणी मागून घ्यावी स्वतःहून प्रश्न सुटत नसतात त्यासाठी लढा द्यावा लागतो असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमात भजन, तमाशा, कीर्तन, नकला, पोवाडे, लोकगीत, भीम गीत व विविध संस्थेचे कार्यक्रम असे सांस्कृतिक कार्यक्रम याप्रसंगी दोन दिवस सादर करण्यात आले. भंडारा - गोंदिया नागपूर जिल्ह्यातील जवळपास ११० मंडळांनी येथे भाग घेतला सर्व मंडळाच्या सर्व सदस्यांना प्रमाणपत्र




सुद्धा वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन उमेश बोरकर यांनी केले तर आभार जिल्हाध्यक्ष श्रीकांत नागदेवे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सुवर्णमाला गजभिये, शितल नागदेवे, उत्तमा गडपायले, गणेश मेश्राम, शालिनी भेंडारकर, भारती व्यास, निशा ईसापुरे, उषा राऊत, स्मिता भदाडे, मंजुषा खांडेकर, रजिया भैसारे, दुर्गा हजारे, जयश्री खानोलकर, नम्रता राऊत, दिनेश कटरे, दिनेश टेंभरे, ज्ञानेश्वर रामटेके, कुणाल बोरकर, दशरथ बोरकर, अरविंद कांबळे, चेतक मेश्राम, कैलास कापगते, प्रल्हाद बागडे, धम्मदीप सूर्यवंशी व इतर कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.